## प्रपत्र सी — ७

**वृत्तपत्रे, समाजमाध्यमे व पक्षाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धी करण्यासाठी राजकीय पक्षांकरीता ज्याची उमेदवार म्हणून निवड झालेली आहे, तसेच इतर गुन्हेगारी पूर्वचरित्र नसलेल्या व्यक्तींची निवड का केली नाही, अशा निवडीच्या कारणांसहित, अशा उमेदवाराबाबतची प्रलंबित फौजदारी खटल्यांसह माहिती**

राजकीय पक्षाचे नाव : **शिवसेना**
निवडणुकीचे नाव : **विधानसभा सार्वत्रिक निवडणूक — २०२४**
राज्याचे / संघराज्य क्षेत्राचे नाव : **महाराष्ट्र**

१) मतदारसंघाचे नाव : **१९२ - अलिबाग विधानसभा**
२) उमेदवाराचे नाव : **महेंद्र हरी दळवी**

| अ.क्र. | | |
|---|---|---|
| १ | **पूर्ववर्ती गुन्हेगारी** | |
| | अ. गुन्ह्याचे स्वरूप | भारतीय दंड संहितेचे कलम ३२४, १४९, १४३, - १४७, १४८,५०४, ५०६, मु. पो. अधिनियम कलम ३७ (१) (३)१३५, मारामारी |
| | ब. प्रकरण क्रमांक | स्पेशल केस नं.१३/२०१४ |
| | क. न्यायालयाचे नाव | डी. से जज. सो. अलिबाग |
| | ड. दोषरोप निश्चित केले आहेत किंवा नाही (होय / नाही ) | होय |
| | इ. दोषसिद्धीचा दिनांक, असल्यास | दि. १३-०५-२०२२ |
| | फ. झालेल्या शिक्षेचा तपशील, असल्यास | २ वर्ष व दंड रु.२७१००/- |
| | ग. द्यावयाची आवश्यक इतर कोणतीही माहिती | CRI. Appeal No. ५४८/२०२२ Interim App.No.१६१९/२०२२ Interim App.No.२५३२/२०२२ उच्च न्यायालय, मुंबई. प्रकरण उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. |
| २ | उमेदवाराच्या निवडीकरिता कारणे निवड हि उमेदवाराची अर्हता, संपादणूक व गुणवत्तेच्या संदर्भात असेल व केवळ मतदानात "निवडून येण्याची क्षमता" अशी नसेल (१०० शब्दांपेक्षा जास्त नाही) | माहिती सोबत जोडली आहे |
| ३ | गुन्हेगारी पूर्वचरित्र नसलेल्या इतर व्यक्तींची उमेदवार म्हणून निवड का होऊ शकत नाही याची कारणे (१०० शब्दांपेक्षा जास्त नाही) | माहिती सोबत जोडली आहे |

**अनु.क्र. २**

याच मतदार संघाचे दोन वेळा प्रतिनिधित्व केलेले आहे. त्यामुळे मतदार संघाची रचना येथील समस्या, लोकांच्या मागण्या व प्रश्न यांची पूर्ण कल्पना आहे. अविकसित भागाकरिता वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी रेवस — करंजा उड्डाणपुलाची निर्मिती करून घेतली आहे. मतदार संघात सुसज्ज जिल्हा रुग्णालयासाठी निधी, आर.सी.एफ. कंपनीचा विकास व उत्पादन वाढविणे, रोजगार निर्मिती, अलिबाग-रोहा-सागाव रस्ता जोडणे आदी महत्वाची विकासाची कामे केली आहेत. ५० पेक्षा अधिक ठिकाणी बहुउद्देशीय समाज मंदिरे बांधली आहेत. या सर्व विकास कामांचा विचार करून शिवसेना पक्षातर्फे **श्री. महेंद्र हरी दळवी** यांना उमेदवारी देण्यात आली आहे. इतर इच्छुक उमेदवारांनी निवडणुकीकरीता या उमेदवाराला आपला पाठींबा दिला आहे.

**अनु.क्र. ३**

उमेदवारावर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे असले व शिक्षा देण्यात आले असली तरी उच्च न्यायालयाने अपिलात शिक्षेस स्थगिती दिलेली आहे. उमेदवाराची मतदार संघातील प्रभावीपणे काम करून जनतेचे प्रश्न सोडविण्याची धडपड व सर्व स्तरावरील नागरिकांमध्ये असलेली लोकप्रियता याचा साकल्याने विचार करून यांच्या सारखा अनुभवी उमेदवार न आढळल्याने अन्य व्यक्तींची निवड करण्यात आली नाही.

शिवसेना मध्यवर्ती कार्यालय

**आपला,**

**संजय भाऊराव मोरे**
**शिवसेना सचिव**